**प्रसिध्दी पत्रक** दिनांक १२/०३/२०२४

आरोपी लोकसेवक- दीप दौलतराव बागुल, वय 39 वर्षे, पद- निरीक्षक (वर्ग-3), नेमणुक- धर्मदाय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 10000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | दीप दौलतराव बागुल, वय 39 वर्षे, पद- निरीक्षक, धर्मदाय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर रा. प्लॅट नं.103 रामगोपालनगर श्रीरामपार्क, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | :- | 10000/- |
| लाच स्विकृती रक्कम | | 10000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना कालीमठ ट्रस्ट (उपळा) येथील गुप्त दान पेटी उघडून त्यातील दान रकमेचा हिशोब करुन सदरची रक्कम ट्रस्टी चे ताब्यात देण्यासाठी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांना कालीमठ ट्रस्ट (उपळा) येथील गुप्त दान पेटी उघडून त्यातील दान रकमेचा हिशोब करुन सदरची रक्कम ट्रस्टी चे ताब्यात देण्यासाठी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून. आरोपी लोकसेवक श्री. दीप बागुल यांनी तक्रारदार यांच्याकडे 10000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.11/03/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. दीप बागुल यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 10000/-रुपये मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आज दि. 12/03/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. दीप बागुल यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष कालीमठ फाटा येथे रुपये 10000/- लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण, ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक गोरखनाथ गांगुर्डे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार दिगंबर पाठक, राजेंद्र सिनकर, भिमराज जिवडे, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.